**महाराष्ट्र शासन**

क्र.एनजीसी २०१२/(२८३/१२)/मशि-४
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-४०००३२
दिनांक: २७ जून, २०१३

प्रति,

सचिव,
धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्देशिय संस्था,
मेहकर, जि. बुलढाणा

विषय: विज्ञान शाखेमध्ये सहशिक्षणास परवानगी देणेबाबत.
धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्देशिय संस्था, मेहकर, जि. बुलढाणा संचलित कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि. बुलढाणा.

संदर्भ: १) शासन पत्र क्र. एनजीसी ३५९६/नमवि/(४४६/९६) / मशि-३, दिनांक ११.१०.१९९६

२) शासन पत्र क्र. एनजीसी २०११/(१४५/११)/मशि-४, दि. १८ जून, २०११.

३) अध्यक्ष, धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्देशिय संस्था, मेहकर, जि. बुलढाणा यांचे दि. १८.७.२०१२ चे पत्र.

४) संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. अशाम/२०१३/को-एज्युकेशन/अवि/मवि-३/ दि. ३०.४.२०१३

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भ क्र. ३ येथील पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्देशिय संस्था, मेहकर, जि. बुलढाणा संचलित कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि. बुलढाणा या महाविद्यालयास शासनाच्या संदर्भाधिन क्र. १ अन्वये शैक्षणिक वर्ष सन १९९७-९८ पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानंतर संदर्भाधिन क्र. २ अन्वये विज्ञान शाखेच्या नुतनीकरणास मंजूरी देण्यात आलेली आहे.

२. संस्थेने संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये संस्थेच्या विज्ञान विद्याशाखेमध्ये मुलामुलींना एकत्रित (सहशिक्षण) प्रवेश देण्याची विनंती शासनास केलेली आहे. त्या अनुषंगाने संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी संदर्भाधीन क्र. ४ येथील पत्रान्वये केलेली शिफारस विचारात घेऊन, संस्थेच्या कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि. बुलढाणा या महाविद्यालयातील विज्ञान विद्याशाखेमध्ये फक्त मुलींऐवजी मुलामुलींना एकत्रित (सहशिक्षणास) प्रवेश देण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर महाविद्यालयास भविष्यात शासनाकडून कोणतेही अर्थिक अनुदान मिळणार नाही. तसे हमीपत्र त्यांनी सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडे सादर करावे.

२) विभागीय सहसंचालकांचे वरील प्रमाणे हमीपत्र सादर केल्याविषयीचे पत्र प्राप्त झाल्याशिवाय विद्यापीठाने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.

३) विद्यापीठाने विहित केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक वर्ग/ कर्मचारी वर्ग महाविद्यालयाने नेमणे आवश्यक असून इतर आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात.

(ग. सं. कचरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
३. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती.
४. सचिव, धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्देशिय संस्था, मेहकर, जि. बुलढाणा
५. निवड नस्ती, मशि-४

आ.क्र. ५८३-१३
दि. १३-१२-१३

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती.

क्रमांकःसंगाबाअवि/८/सी-२०२३ /२०१३.
दिनांकः ३०/११/२०१३.

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्देशिय संस्था,
मेहकर,
जि.बुलडाणा.

**विषयः- धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउदेशिय संस्था,मेहकर,जि.बुलडाणा द्वारा संचालित कला व विज्ञान महिला महाविद्यालय,मेहकर, जि.बुलडाणा या महाविद्यालयाचे विज्ञान विद्याशाखेत सहशिक्षण सुरु करणेबाबत..**

संदर्भः- शासन पत्र क्र.एनजीसी २०१२/(२८३/१२)/मशि-४,दि.२७ जुन २०१३

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भांकित शासनपत्र विद्वत परिषदेच्या दि.३१/८/२०१३ चे सभेपुढे विचारार्थ ठेवण्यात आले होते.सदर पत्रावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

"महाराष्ट्र शासन पत्र क्र.एनजीसी २०१२/(२८३/१२)/मशि-४,दि.२७ जुन २०१३ नुसार धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउदेशिय संस्था,मेहकर,जि.बुलडाणा द्वारा संचालित कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि.बुलडाणा या महाविद्यालयाचे विज्ञान विद्याशाखेत सहशिक्षण सुरु करणेबाबत परवानगी मिळालेल्या पत्रावर जे पुस्तक क्र १५/२०१३ मध्ये पृष्ठ क्र.सी-४२८१ ते सी-४२८४ वर वितरीत केले होते त्यावर विचारविनीमय करुन सदर महाविद्यालयाचे विज्ञान विद्याशाखेत सहशिक्षण सुरु करण्यास मान्यता देण्यात आली."

उपरोक्त विद्वत परिषदेचा निर्णय आपले माहितीकरिता कळविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव (मवि),
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

उपकुलसचिव (म.वि.)
संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

**प्रतिलीपी माहितीस्तवः-**
सहा.कुलसचिव (प/ना), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

औ.क्र. ४५ दि. ०२-०८-१३

**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**

**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

Web : www.dhepune.gov.in E-Mail : dhepune@yahoo.co.in

फोन नं.०२०/२६१२२१११, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्रमांक - अमवि/२०१३/३१६१५/शा.पत्र/अवि/मवि-३ / 8254 दिनांक- /७/२०१३

11 JUL 2013

प्रति,

सहसंचालक

उच्च शिक्षण

अमरावती विभाग अमरावती

**विषय- विज्ञान शाखेमध्ये सहशिक्षणास परवानगी देणेबाबत**
**धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्येशिय संस्था, मेहकर, जि.बुलडाणा संचलित**
**कला व विज्ञान महिला महाविद्यालय मेहकर जि.बुलढाणा**

संदर्भ- शासनपत्र क्र.एनजीसी २०१२/(२८३/१२)/मशि-४ दि.२७ जुन २०१३

उपरोक्त विषयाबाबत शासनाचे संदर्भिय पत्र यासोबत पुढील कार्यवाहीसाठी जोडले आहे. शासनपत्रात दिलेल्या सुचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच याबाबत संबंधित महाविद्यालयास कळविण्यात यावे.

11/7/2013

(डॉ.प्र.रा.गायकवाड)

प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य,पुणे-१

प्रत- मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन ,मुंबई-३२ यांना शासनपत्र क्र.एनजीसी २०१२/(२८३/१२)/मशि-४ दि.२७ जुन २०१३ च्या संदर्भात माहितीसाठी सादर

प्रत-कुलसचिव,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती

प्रत-सचिव,धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्येशिय संस्था मेहकर जि.बुलडाणा